# मध्ययुगीन साहित्यान्वय


संपादक

**डॉ. संतोष चव्हाण**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख

शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड, ता. पैठण,

जि. औरंगाबाद.

भ्रमणध्वनी : ८००७७०१०५७

**डॉ. राजीव यशवंते**

मराठी विभाग

गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं.)

ता. पूर्णा, जि. परभणी.

भ्रमणध्वनी : ८७८८२८४६२१

**डॉ. सुधाकर जाधव**

मराठी विभाग

लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर,

जि. जालना

भ्रमणध्वनी : ९४२२७९६४७५



**एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स**

औरंगपुरा, औरंगाबाद



Scanned with CamScanner

# मध्ययुगीन साहित्यान्वय

डॉ. संतोष चव्हाण

डॉ. गजानन यशवंत

डॉ. सुधाकर जाधव

© लेखकाधीन

**ISBN : 978-93-90005-01-7**

◆ **प्रकाशक**

**एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स**

औरंगपुरा, औरंगाबाद

मो. नं. ९९७००६७९७९, ९४२१३०००३६

◆ **अक्षरजुळणी**

अकबर शेख

अक्षर कॉम्प्युटर्स

जवाहर कॉलनी, औरंगाबाद

भ्रमणध्वनी : ९३७२०५७०५७

◆ **मुखपृष्ठ**

सरदार जाधव, औरंगाबाद

◆ **प्रथमावृत्ती**

३ मार्च २०२०

◆ **मूल्य** : ४१० रुपये

Scanned with CamScanner

# ११. भक्तीमार्गाचे पुरस्कर्ते : संत एकनाथ

- प्रा.डॉ. सदाशिव सरकटे

संत ज्ञानेश्वरांनंतर सुमारे तीनशे वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. विजयनगरहून श्री विठ्ठलमूर्ती परत पंढरपूरास आणणारे सुप्रसिद्ध संत भानुदास हे एकनाथांचे आजोबा. अशा पुण्यपावन वारकरी संप्रदायाची परंपरा लाभलेल्या कुटुंबात पैठण येथे नाथांचा जन्म झाला.

नाथांचे गुरू जनार्दन स्वामी हे स्वत: दत्तसंप्रदायी होते. राजदरबारातील कामकाजाचे उत्तम जाणकार व प्राचीन धर्मग्रंथाचे व्यासंगी अभ्यासक असणाऱ्या जनार्दन स्वामींनी पैठणच्या वैदिक परंपरेबरोबरच ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथातील विचार एकनाथांपर्यंत पोहोचविले. वारकरी संप्रदाय आणि पैठणची वैदिक परंपरा यांचे संस्कार पुढे जाऊन नाथांचा समन्वयवादी दृष्टिकोन निर्माण करण्यास उपयोगी ठरले.

नाथांनी वयाच्या बाराव्या वर्षापासून गुरुसेवेस सुरुवात केली. त्यांना वयाच्या अठराव्या वर्षी सुलभ पर्वतावर परमेश्वरी शक्तीचा सगुण साक्षात्कार झाला. तेथून पुढे गुरुसोबत विविध तीर्थक्षेत्रांची तीर्थयात्रा पूर्ण करून वयाच्या पंचविसाव्या वर्षी पैठणास गृहस्थाश्रम स्वीकारला आणि लौकीक प्रपंचासोबत पारमार्थिक प्रपंच यशस्वीपणे केला. प्रपंच व परमार्थ यांचा सुयोग्य समन्वय साधणाऱ्या नाथांचे इ.स. १५९९ साली वयाच्या ७१व्या वर्षी देहावसान झाले. ही नाथांची जिवीत यात्रा.

## एकनाथकालीन महाराष्ट्र

महाराष्ट्रातील रामदेवरायाची राजवट संपून सर्वत्र मुसलमानशाही स्थापन झालेली होती. महाराष्ट्र संस्कृतीची इस्लामी सत्तेने व मराठी भाषेची फारशी उर्दू भाषेने चांगलीच गळचेपी केली होती. या राजकीय परिस्थितीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रीयांची अवनती झालेली होती. या अवनतीच्या जोडीला हिंदू समाजव्यवस्थेतील विषमता, जातीयता, वर्णद्वेष, अज्ञान, दारिद्र्य, ब्राह्मण व वेदशास्त्र्यांचे अध:पतन, ढोंगी बाबा बुवांचा सुळसुळाट, वाढलेल्या शूद्र देवता आणि त्यांच्या पूजा अर्चा, कर्मकांड यामुळे हिंदू समाजाची दु:स्थिती झाली होती. या सर्वांचा परिपाक म्हणून हिंदू समाजात



Scanned with CamScanner

नवस सायास, कोंबडे बकरे, अंगारा धुपारा वाढला होता. हिंदू लोक पीरांना भजू लागले होते. काही हिंदू इस्लामचा स्वीकार करून मुसलमानी सत्तेची चाकरी करीत होते. हिंदू समाजाच्या पोशाख, खाणे-पिणे, आहार-विहार, चाली-रिती, सण-वार यावरही राज्यकर्त्यांचे अतिक्रमण होऊन ब्रह्मतेज पूर्णपणे लोपले होते. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा लोकांना विसर पडला होता, खुद्द ज्ञानेश्वरीतील पाठांमध्ये अपपाठ शिरले होते. भक्तीमार्ग संपला होता.

अशा स्थितीत महाराष्ट्रीय समाजाला पुन्हा भक्तीप्रवण करून जीवनाच्या योग्य मार्गावर आणण्याचे कार्य एकनाथांनी केले. प्रपंच आणि परमार्थ यांची विलक्षण सांगड घालून मंदिरांच्या प्राकारांपासून ते जनसामान्यांच्या अंगणापर्यंत भक्तीची वाट नाथांनी तयार केली. या भक्तीमार्गावर विवेकाचा सडा घातला, सामाजिक निती आणि मानवतेचे वृक्ष लावले, आत्मज्ञान आणि भूतदयेच्या दीपांनी सारी अंत:करणे उजळून टाकली. एकनाथांच्या या अलौकीक कार्यामुळेच समन्वयकार एकनाथ 'हे खरे महाराष्ट्राचे नाथ होते' या शब्दात न्या. रानडे यांनी एकनाथांच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

## नाथांची ग्रंथरचना

भागवत संप्रदायाचे कार्य व ग्रंथनिर्मितीचे ध्येय याबाबतीत नाथ ज्ञानेश्वरांचे अवतारच ठरतात. नाथांनी विविध अशी विपूल ग्रंथरचना केलेली आढळते. यामध्ये पंडीत आणि विद्वानांसाठी : १. चतु:श्लोकी भागवत २. एकनाथी भागवत, मध्यमवर्गीयांसाठी १. रुक्मिणीस्वयंवर २. भावार्थ रामायण त्याचप्रमाणे त्यांनी सर्वसामान्य जनांसाठी १. पदे २. गौळणी ३. अभंग ४. भारुडे अशी मिळून व स्फूट प्रकरणांसह नाथांची रचना सुमारे पाऊण लाख भरते. या सर्व वाङ्मयनिर्मितीचा प्रमुख हेतू भक्तीमार्गाचा प्रचार आणि प्रसार हाच होता.

या स्वतंत्र ग्रंथरचनेच्या कामाबरोबरच नाथांनी केलेले अनमोल असे कार्य म्हणजे नामशेष होऊ पाहणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या समाधीस्थळाचा जिर्णोद्धार आणि 'पाठांतरी शुद्धाबद्ध' झालेल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाचे संशोधन. प्राचीन मराठी वाङ्मयाचे अभ्यासक ल. रा. नसिराबादकर संत एकनाथांच्या एकूणच जीवितकार्याची दखल घेताना म्हणतात, "दत्त आणि वारकरी संप्रदाय, प्रपंच आणि परमार्थ, काव्य आणि तत्त्वज्ञान, संस्कृत आणि प्राकृत, पंडीतश्रेष्ठ आणि जनसामान्य अशा दोन ध्रुवांचा समन्वय नाथांनी



Scanned with CamScanner

आपल्या जीवनात व कवितेत घातला. यामुळे 'समन्वयकार एकनाथ' अशा शब्दांतच नाथांचे वर्णन करणे उचित ठरेल''. (नसिराबादकर, २०१०, १२०)

## १. चतु:श्लोकी भागवत

पंचवटीस गुरू जनार्दन स्वामींच्या आज्ञेने भागवताच्या दुसऱ्या स्कंधावरील ९ व्या अध्यायाच्या ३२ ते ३५ या चार श्लोकांवर नाथांनी १०३६ ओव्यांचा हा ग्रंथ लिहिला. 'सृष्टीरूपी मीच वसे' या सिद्धांताचे प्रतिपादन त्यांनी या ग्रंथातून केले तर सर्वाभुती भागवद्भाव हीच माझी मुख्य भक्ती हा खुद्द भगवंतांचा, भागवत संप्रदायाचा संदेश त्यांनी याच ग्रंथातून समाजमनाला दिला. चतु:श्लोकी भागवत या ग्रंथरचनेच्या पाठीमागे समाजाला लोकसेवेची जाणीव देणे हा नाथांचा हेतू होता. या लेखनात त्यांनी श्रोतवंदन केले आहे. संतकृपा व संतसहवासाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. या ग्रंथलेखनामधून गुरूमहिमा प्रतिपादन करताना ग्रंथलेखनाचे सारे श्रेय गुरुंच्या चरणी अर्पण केले आहे. स्वभाषेतून जनसामान्यांपर्यंत भागवत संप्रदायाचे तत्त्वज्ञान पोहचवत असताना त्यांनी ज्ञानेश्वरांचा आदर्श जोपासला आहे.

''श्री भागवत आणि भाषा मराठे । हे बोलने नवल वाटे ।
पूर्वी नाही ऐकिले कोठे । अभिनव मोठे धिटावा केला ।।''

असा भाषाभिमान त्यांनी व्यक्त केला आहे.

## २. एकनाथी भागवत

इ.स. १५७० ते १५७३ या कालावधीत गुरूंच्या आज्ञेवरून भागवताच्या एकादशस्कंधावर हा ग्रंथ लिहिला. ग्रंथलेखन प्रारंभ पैठण येथे तर लेखन समाप्ती कासी येथे झाली. या ग्रंथाची काशीक्षेत्रीच्या विद्वानांनी मिरवणूक काढली. 'भोळे भोळे विषयी जन । याचे करिता श्रवण पठण ।।' म्हणून या ग्रंथाचा उद्देश स्वत: नाथांनी सांगितला आहे. या ग्रंथाची ओवीसंख्या १८,८०० असून भाषा रसाळ व प्रासादिक आहे. ग्रंथारंभी श्रीव्यासादिक, निवृत्ती, ज्ञानेश्वर, नामदेव यांना नाथांनी वंदन केले आहे. गुरूभक्ती हा नाथांच्या जिव्हाळ्याचा विषय असून या ग्रंथात गुरूभक्ती व्यक्त करताना, गुरूविषयी पूज्यभाव व्यक्त करताना गुरूवर धन्वंतरी, क्षीरसागर, चित्समुद्र अशी रूपके त्यांनी केली आहेत. या ग्रंथात ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ व अभक्त ब्राह्मणापेक्षा भक्ती करणारा शूद्र श्रेष्ठ असे भक्तीचे महत्त्व प्रतिपादन करताना 'भक्ती ते मूळ । ज्ञान ते फळ । वैराग्य केवळ । तेथीचे फूले ।।'



Scanned with CamScanner

यातून भक्तीचे महत्त्व विशद केले आहे. मध्ययुगीन कालखंडात भक्तीमार्गाचा जोरदार पुरस्कार नाथांनी केला. हे भक्तीमार्गाच्या पुरस्काराचे कार्य त्यांनी किती पराकाष्ठेने व तळमळीने केले याबद्दल प्र.न. जोशी म्हणतात, "भक्तीच्या व परमार्थाच्या क्षेत्रात जातिभेद नाही ही ज्ञानेश्वरांची ग्वाही एकनाथांनी समकालीन कर्मठ ब्राह्मणांचा व स्वतःच्या मुलाचा विरोध सहन करून प्रत्यक्ष व्यवहारात आणली." (जोशी, ISBN 81-85601-66-3, 136) एकनाथी भागवत या ग्रंथातून स्वभाषेविषयीचा आदर व अभिमान व्यक्त करताना नाथ म्हणतात,

"ग्रंथ देशभाषा व्युत्पत्ती । म्हणोनि नुपेक्षावी पंडिती ।

अर्थ पहावा यथार्थी । परमात्मा स्थिती निजनिष्ठा ॥"

या मधून स्वभाषाभिमान् आणि परमार्थ निरुपणातील नाथांचा आत्मविश्वास अधोरेखित होतो. साधी-सोपी रसाळ भाषा, कथात्म निवेदनशैली, जन तोचि जनार्दन, लोकसंग्रह या तत्त्वावरील भर आणि विनयशीलतेने ग्रंथलेखनाचे श्रेय गुरूचरणी अर्पण केल्यामुळे हा ग्रंथ नितांतसुंदर झाला आहे.

## ३. रूक्मिणीस्वयंवर

नाथांचे हे पहिलेच आख्यानकाव्य भागवताच्या दशमस्कंधावरील १४४ श्लोकांवर नाथांनी हे १८ अध्याय व १७११ ओव्यांचे काव्य लिहले. या काव्यामध्ये पहिल्या ७ अध्यायात रुक्मिणीहरणाची कथाभाग आलेला असून पुढील ६ अध्यायात युद्धवर्णन आणि शेवटच्या ५ अध्यायात विवाहसमारंभाचे वर्णन केले आहे. या आख्यानकाव्यात रुक्मिणी हा जीव तर श्रीकृष्ण हा शिव असे रूपक केलेले आहे. या ग्रंथातून रुक्मिणीची वैयक्तिक व्यक्तिरेखा अतिशय ठसठशीतपणे रेखाटली आहे.रुक्मिणीला झालेला कृष्ण विरह "करु जाता उदकपान । घोटासवे आठवे कृष्ण ।" अशा शब्दामधून अतिशय उत्कटत्वाने रेखाटला आहे.

या आख्यानकाव्यात रुक्मिणीहरणानंतरचे कृष्ण रुक्मि यांच्यामधील युद्ध, त्या युद्धात रुक्मिची झालेली फजिती, कृष्ण रुक्मिणी विवाह या प्रसंगाच्या वर्णनात वीर, हास्य व नर्मशृंगार या रसाची निर्मिती चांगली साधली आहे. तर विवाहसमारंभ वर्णनात नाथकालिन सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब उमटले आहे. या ग्रंथाच्या शेवटी आख्यान वाचनाची फलश्रुती देऊन नाथ श्रोत्यांना सुखवितात व ग्रंथवाचनास प्रोत्साहन करतात. मराठी भाषेमध्ये आख्यानकाव्यांचा प्रारंभ जरी महानुभावांनी केला असला तरी



Scanned with CamScanner

अत्यंत साधी भाषा, लोकजिवनाचे चित्रण आणि मुळांशी अध्यात्माची बैठक या आपल्या अंगभूत लेखनगुणांच्या जोरावर आख्यानकाव्यास लोकभोग्य व लोकप्रिय बनविले ते नाथांनी.

### ४. भावार्थ रामायण

नाथांच्या देहावसानामुळे अपूर्ण राहिलेला पण नाथांचा एकनिष्ठ भक्त गावबा यांनी आपल्या गुरुपश्चात पूर्ण केलेला ग्रंथ म्हणजे भावार्थ रामायण. या ग्रंथामध्ये एकूण ९२ अध्याय, ७ कांड आणि ४०,००० एवढी प्रचंड ओवी संख्या असलेली दिसून येते. या ग्रंथाच्या आरंभीच नाथांनी गणेशवंदन, श्रोतृवंदन, संतवंदन केले आहे. या ग्रंथलेखनाची प्रेरणा आपणास स्वतः प्रभु श्रीरामच देत असल्याचे नम्रपणे निवेदिले आहे.

"माझे अंगी मुर्खपण । माझे मी जाणे संपूर्ण ।<br>
न करी म्हणता रामायण । श्रीराम आपण कथा प्रेरी ॥<br>
मी निजलो असता जाण । राम थापटी आपण ।<br>
म्हणे उठी करी रामायण । तेथ मी कोण न करावया ॥"

या ग्रंथातून नाथांनी रामाची कथा रूपकाच्या थाटात सांगितली आहे. या रूपकानुसार राजा दशरथ-दशइंद्रिय, कौसल्या-सद्विद्या, कैकयी-अविदया, लक्ष्मण-आत्मप्रबोध, भरत-भावार्थ, राम-आनंदविग्रह, विश्वमित्र-विवेक, वसिष्ठ-विचार अशी मांडणी नाथांनी केलेली आढळते. राम व सीतेचे एकरूपत्व सांगताना सीता हा जीव तर राम हा जीवन, राम हा साखर तर सीता ही गोडी असे वर्णन केलेले आहे. रामाशिवाय सीतेला होणारा विरहभाव वर्णन करताना नाथ म्हणतात, "श्रीरामेवीण उदकपान । ते मरणप्रद विपदारुण ।" अशा प्रकारे सीतेच्या मनाची कारुण्यावस्था ते नेमकेपणाने चित्रित करतात. या ग्रंथामधून हनुमानाची रामभक्ती तर आदर्शवत ठरावी अशी उतरली आहे. या ग्रंथाच्या लेखनात एकनाथ रामायण कालातून स्वकालात उतरतात व दुःखस्थितीत असलेल्या समाजाला भक्तीभावाचा व जिवनाचा सन्मार्ग दाखवण्यासाठी निती, कर्तव्य, निष्ठा यांचा आदर्श म्हणून श्रीरामाचे चरित्र पुढे ठेवतात. या ग्रंथातून नाथांनी स्वधर्माभिमान व वीरता यांना आव्हान केले आहे. जगाची दुःखे नासून रामराज्यांची गुढी उभारणे या ग्रंथाचे उद्दिष्ट दिसते. या ग्रंथात राष्ट्रभावनेची बीजे दिसतात.

### स्फूट प्रकरणे

नाथांनी 'स्वात्मसुख', 'शुकाष्टक', 'गीतासार', 'हस्तामलक',

'आनंदलहरी, 'गीतामहिमा' असी बरीचशी स्फूट प्रकरणे श्रोतृवर्गास बोध करण्यासाठी लिहिली. किर्तनासाठी म्हणून त्यांनी ध्रुव, प्रल्हाद इत्यादी भक्तांची तर संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत चोखामेळा इ. संतांची चरित्रे लिहून त्याद्वारे भक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवला.

**पदे व गौळणी :** नाथांनी लोकरंजनातून लोकशिक्षणासाठी पदे व गौळणी रचल्या. "सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी" यानुसार त्यांनी श्री रामचंद्र, सीता, हनुमंत, कृष्णचरित्र, कृष्णलीला, कृष्ण-गोपी, कृष्ण-यशोदा या विषयावर अतिशय सुंदर पदे व गौळणी रचल्या. त्यामध्ये
"असा कसा देवाचा देव बाई ठकडा ।
देव एका पायाने लंगडा ग बाई लंगडा ॥"
श्री कृष्ण वर्णन
"मन राम रंगी रंगले । अवघे मनचि राम झाले"
श्री राम वर्णन
"ऐक ऐक सखये बाई । नवल मी सांगू काई ।
त्रैलोक्याचा धनी तो हा । यसोदेशी म्हणतो आई ।" बालकृष्ण वर्णन
"वारियाने कुंडल हाले । डोळे मोडीत राधा चाले ॥
राधा पाहुनि भुलले हरी । बैल दुभे नंदाघरी"
राधा कृष्ण 'वर्णन

नाथांच्या या लेखनातून चित्रमयता, प्रासादिकता, नादमयता, वेचकता, कथात्मकता, रसयुक्तता या सर्वांसह अध्यात्माची किनार ही नाथांच्या रचनेची वैशिष्ट्ये आढळतात.

**भारुडे**

महाराष्ट्रात दशावतार, लळीत, भारुड यांची दीर्घ परंपरा आहे. नामदेव, ज्ञानदेवापासून ही परंपरा असली तरी धर्मजागरणासाठी प्रभावी माध्यम म्हणून नाथांनी त्याचा उपयोग करून घेतला. भारुडाचे जे पूर्व रूप होते त्याचा आकार, आशय, अभिव्यक्ती व पद्धती हे सारेच घटक परिवर्तीत करून नाथांनी त्याच्या विशिष्ट सादरीकरणामुळे हा एक नृत्य-नाट्यप्रकार व स्वतंत्र विधा म्हणून नावारुपाला आणला. नाथांनी सुमारे ३०० भारुडे रचली.

बहुजनांसाठी, अज्ञ-जनांसाठी त्यांना समजेल, रुचेल आणि पचेल असा रचना करणे हा नाथांचा भारुड रचनेमागील दृष्टिकोन होता. लोकांना



Scanned with CamScanner

व्यवहारिक, नितीपर व अध्यात्मिक उपदेश करणे आणि या माध्यमातून लोकजीवन उन्नत बनविणे हा नाथांचा उद्देश होता. नाथांनी भारुडाच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधन कार्याचे मूल्यमापन करताना डॉ. वसंत जोशी म्हणतात, "लोकसाहित्यकार आणि लोकशिक्षक या दोन्ही भूमिका समर्थपणे वठविणारा संत एकनाथांसारखा अन्य कोणताही कवी मध्ययुगीन मराठी साहित्यात आढळत नाही." (जोशी, १९९४, ६) बहुजनांच्या नित्याच्या जीवनातील तत्कालीन समाजात नित्य आढळणारी ज्योतिषी, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, गारुडी, वैदु, दरवेशी, फकीर, महारीण, जागल्या, वासुदेव, जोशी, बाळसंतोष इ. माणसे खेड्या-पाड्यातील लोकांच्या नित्याच्या परिचयाची होती. मरीआई, सटवाई, जानाई, जोखाई इ. देवताही त्यांना चांगल्या माहित होत्या. या लोकांचे आचार-विचार, व्यवसाय, भाषा यांचा आधार घेत नाथांनी भारुडाची रचना केली. ही भारुडे म्हणजे नाथकालीन लोकजीवनाचे व लोकसाहित्याचे प्रकट दर्शनच होय. याबरोबरच त्यांनी तत्कालीन प्राणीसृष्टीवर आणि सण, वार, खेळ यावरही भारुडे रचली. नाथांची भारुड रचना बहुविध स्वरूपाची आहे. त्यातून लोकाच्याच भाषेत लोकजीवनातील उदाहरणे देऊन नाथांनी अध्यात्म शिकविले, मनोरंजनातून परमार्थाची भाषा शिकविली.

"मी परात्पर जोशी । होरा सांगेन संतसभेसी"

(श्रीरामाला शरण जाण्याचा उपदेश)

"दार उघड बया दार उघड । बया दार उघड बया दार" (जगदंबेला आवाहन)

"उठा की जी मायबाप । कशी लागली झोप
हुजुर जाऊनिया तेवढी चुकवा खेप ।।"

(जागल्याने केलेला पुकारा)

"दादला नको ग बाई । मला दादला नको ग बाई"

(सुनेचे मनोगत व त्यातून आध्यात्माची शिकवण)

"विंचू चावला विंचू चावला विंचू चावला" (षड्विकारांपासून दूर राहण्याचा उपदेश)

"सांगते तुम्हाला वेगळे निघा । वेगळे निघून संसार बघा" संसार करिता शिणले भारी । सासू सासरा घातला भरी ।।" (ईश्वर नामाचा उपदेश)

याप्रमाणे आपल्या विविध भारुड रचनांमधून लाच खावू नये, इमान



Scanned with CamScanner

सोडू नये, भक्तीमार्गी खंड पाडू नये अशी निती नाथ शिकविता. नाथांच्या भारुडांबद्दल डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात, ''नाथांनी भारुडाच्या माध्यमातून अध्यात्म सांगितले आणि प्रभावीपणे प्रबोधन घडविले. नाथांच्या भारुडावरून ते एक उत्तम लोकशिक्षक, प्रबोधनकार आणि समाजसुधारक होते याची खात्री पटते.'' (देखणे, २००२, २१) नाथांच्या भारुडविश्वात शृंगार, विनोद, मानवी स्वभावाची विविधता, तत्कालीन समाज जीवनाचे दर्शन आणि यातून अत्यंत सोपे असे अध्यात्मनिवेदन ही वैशिष्ट्ये आढळतात. व्यक्ती आणि प्रसंग याप्रमाणे बदलणारी भाषा, नाट्यनुकूलता आणि गेयता त्यात पदोपदी जाणवते.

**अभंग रचना व गद्य प्रकरणे**

नाथांच्या एकूण ग्रंथसंपदेमध्ये अभंगरचनेलाही महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांनी विठ्ठलवर्णन, नाममहात्म्य, पंढरीमहात्म्य, भागवत संप्रदायाची तत्त्वे, साधकांना व संसारिकांना उपदेश, परमातम्यांशी एकरूपत्वाचा अनुभव इ. विषयावर अभंगरचना केलेली आढळते. एकनाथांच्या अभंगवाङ्‌मयाचे विश्लेषण करताना श्री.म.माटे लिहितात, ''एकनाथांचे अभंग वाङ्‌मय वाचून पाहावे, म्हणजे इतर सर्व पंथ, संप्रदाय, दैवते, इतकेच काय पण ज्ञान, ब्रह्मकर्म इत्यादी सारी मागे टाकून त्यांनी भक्तीवर जोर दिलेला आहे, असे दिसेल. मात्र या भक्तीत विषयवैराग्य पुरते बाणलेले आहे आणि प्रपंचविन्मुखता भिनलेली आहे, असेही दिसून येईल. एकनाथांच्या स्वतंत्र वाङ्‌मयाचे हे मुख्य बळ आहे.'' (माटे, २००६, १०३) तर त्यांनी रचलेली ''दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हारपले मन झाले उन्मन'' ही श्री दत्तात्रेयाची आरती आजही सर्वांच्या मुखी आहे. तसेच नाथांनी अर्ज, अर्जदस्त, अभयपत्र, ताकीदपत्र, कऊलपत्र या गद्यात्मक प्रकरणांमधून अध्यात्मिक उपदेश केलेला आहे. नाथांची गद्यरचना हा १६ व्या शतकातील मराठी गद्याचा प्रतिनिधिक नमुना आहे. मराठी भाषेच्या भाषाशास्त्रीय अभ्यासांसाठी नाथांनी गद्यरचना महत्त्वपूर्ण प्राथमिक स्त्रोत आहे.

नाथांच्या एकूणच जीवीतकार्याचा विचार करता नाथांनी १६ व्या शतकात केलेली वाङ्‌मयीन कामगिरी अक्षरश: डोळे दिपवून टाकणारी अशीच आहे. ही सर्व वाङ्‌मयीन कामगिरी समाजाची अध्यात्मिक जीवनजाणीव प्रगल्भ करणारी ठरली आहे. एकनाथांच्या वाङ्‌मयनिर्मितीचा प्रमुख हेतू भक्तीमार्गाचा प्रचार आणि प्रसार करणे हाच असल्याचे दिसून येते.



Scanned with CamScanner

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान नाथांच्या वाङ्मयाचे घडविलेले आहे. समाजातील विद्वतजनांपासून ते सर्वसामान्यजनांना भुरळ घालणारी आणि लोकरंजनातून लोकशिक्षण करण्याची हातोटी असणारी नाथांची वाङ्मयीन कामगिरी निर्विवाद श्रेष्ठ आहे. भागवत धर्म व महाराष्ट्र यांच्या जडणघडणीच्या कार्यात नाथांच्या ऐतिहासिक कामगिरीचे मूल्यमापन करताना संत बहिणाबाईच्या,

"जनार्दनी एकनाथ । खांबं दिला भागवत"

या उक्तीतून नाथांच्या एकूण जीवितकार्याचे मार्मिक सूचन झालेले आहे.

**संदर्भ**


१. नसिराबादकर ल.रा. (दहावी आवृत्ती, २०१०), 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. माटे श्री. म. (द्वितीयावृत्ती, २००६), 'संत पंत व तंत', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. देखणे रामचंद्र (२००), 'भारुड वाङ्मयातील तत्त्वज्ञान', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

४. जोशी प्र.न. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.


□□□

**- प्रा.डॉ. सदाशिव सरकटे**

Scanned with CamScanner